भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क



● पुणे ● वर्ष ८ वे अंक ४ था ● जानेवारी - मार्च २०१४ ● किंमत रु. २०/-(वार्षिक वर्गणी १००/-)



## प्रजासत्ताक
## दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

संक्रमणी सुख चिंतती

सारे एकमेका भेटती

तिळगुळ परस्परां वाटती

प्रेमभावना वृद्धींगत होती

# मकरसंक्रांती

देश विविध रंगाचा, देश विविध ढंगाचा

देश विविधता जपणाऱ्या एकात्मतेचा...

## कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने
## कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी चालविलेले नियतकालिक

संपर्कात राहुया ! संपर्क वाढवूया!!


शुभं करोति कल्याणम्
आरोग्यं धनसंपदा।
शत्रुबुद्धिविनाशाय
दीपज्योतिर्नमोस्तुते।।
100% NATURAL
100% Pure
Pitambari Agro Division
SaptaShakti
Til Oil
With the power of '7' Ayurvedic entities
2X MORE
विशुद्ध स्वरूपात आणि दर्जेदार
सप्तशक्ती
तीळ तेल
काजळी धरत नाही.
सात्विक शांती लाभते.
कमी लागते, जास्त वेळ जळते.
★ दिव्यासाठी अन्य खाद्यतेलांपेक्षा तीळ तेल अधिक लाभदायक असते.
Pitambari Products Pvt. Ltd., Gokhale Rd., Thane - 2. Tel. : 022 - 67035555
Contact : (Mumbai)9892458248, 9167492736, 7709138899, (Nanded) 9503350949, (Pune) : 9657704502

# संपर्क

संपर्कात राहुया ! संपर्क वाढवुया !!



भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ स्थापना १९८१

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)

वर्ष ८ वे | जानेवारी – मार्च २०१४ | अंक ४ था



अध्यक्षः श्री. आनंद पराडकर मो.नं ९३२६८२६८८४

सचिवः श्री. गोपाळ भाटवडेकर मो.नं ९८५०९७९७०६

कोषाध्यक्षः श्री. चंद्रशेखर जोशी मो.नं ९४४९०५१६५३



संपादक मंडळ

**मुख्य संपादक :**

**श्री. गणेश गुर्जर**

९८९०९९०११३

**श्री. श्री गजानन गुर्जर**

पुणे, ९९७०१७४८१८

**श्री. मकरंद फणसळकर**

पुणे, ९८२२६१७३२४

**शहर प्रतिनिधी :**

श्री. अरविंद भाटवडेकर, मुंबई, ९८७०३०८७१०

श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९०५१६५३

श्रीमती स्वाती प्रभुदेसाई, डोंबिवली, ९७६९३२९९९३

श्री. अविनाश जावडेकर, नागपूर, ९८६०२५७३१५

सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ८८८८२२१७४६

सौ. मानसी मोघे, सातारा, ०२१६२-२३३६४३

श्री. सुनिल जठार, रत्नागिरी/राजापूर, ९२७०५७९४००

श्री मिलींद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८००५८७

श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९०३७३४१

श्री. हेमंत पुराणिक, पुणे, ९९२३८१०१९४

श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९२२७१३५७९४

श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९९५८९२

श्री. चंद्रशेखर आठल्ये, ठाणे, ९८६९६७४९५८

सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१४८७७५



**भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक गोपाळ भाटवडेकर यांनी एकविरा प्रकाशन, कर्वेनगर, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रसाद अपार्टमेंट, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक – गणेश गुर्जर**


## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदरांस या द्वारे आवाहन करण्यात येते की आपली वार्षिक वर्गणी रू. १००/– (रूपये शंभर मात्र) आपल्या शहर प्रतिनिधींकडे जमा करावी. शहर प्रतिनिधींकडे प्रत्येक सभासदाची वर्गणी कोणत्या महिन्यापासून येणे आहे, त्याच्या याद्या पाठवल्या आहेत. त्यानुसार शहर प्रतिनिधींशी संपर्क करून वर्गणी जमा करावी. शहर प्रतिनिधींनी जमा झालेली वर्गणी आपल्या नजिकच्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेत भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या खाते क्रमांक ०५०५१०११०००९४१० वर लक्ष्मीरोड, पुणे शाखेमध्ये जमा करून यादी आणि जमा पावती पुणे कार्यालयाकडे पाठवावी. कोणत्याही अंकापासून वर्गणीदार होता येते. किरकोळ अंक विक्री नाही.

**संपादक**

**– गणेश गुर्जर**


## जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | ४००/– | १५००/– |
| अर्धा | ८००/– | ३०००/– |
| पूर्ण | १६००/– | ६०००/– |
| शुभेच्छा | २५०/– | १०००/– |
| पुर्ण पान रंगीत | २५००/– | १००००/– |



**नियतकालिकाचे नाव** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'

**पत्ता** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,

**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे – ४११ ०३०

**संपादक** : श्री. गणेश गुर्जर

**मुद्रक** : एकविरा प्रकाशन आणि प्रसिद्धी सेवा, स.नं.१/२७ व २९, माऊली सोसायटी, अपर्णा हाऊस समोर, विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, पुणे – ४११ ०५२.

संपर्क

## अनुक्रम


४ बकुळफुले - पाऊस मनातला

५ काव्यसुमन - तिळ स्नेहाचा, संपर्क मेळावा

७ कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर रौप्य महोत्सव वृत्तांत २०१३

९ ठाणे संस्थावृत्त

११ सद्‌गुणांची पाठराखण महत्त्वाची

१३ विविधज्ञ कऱ्हाडे

१७ कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे संस्थेचा कोजागिरी व रक्तदान शिबीर कार्यक्रम

१८ कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नाशिक संस्थेमध्ये कोजागिरी पौर्णिमा साजरी

१८ कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नागपूर संस्थेमध्ये पुस्तक विमोचन, कऱ्हाडे ज्ञाति गुणवंत विद्यार्थी सत्कार व कोजागिरी उत्सव

२० कऱ्हाडे ब्राह्मण संघ मुलुंड संस्थेमध्ये कोजिगिरी पौर्णिमा साजरी व वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

२० आदित्य किंजवडेकरला 'बालवैज्ञानिक' पुरस्कार प्राप्त

२३ बेळगाव शाखेचा वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

२३ दिवाळी पहाट व शारदीय संमेलन डोंबिवली शाखेमध्ये संपन्न

२४ कऱ्हाडे ब्राह्मण संघ - सोलापूर शाखा वृत्तांत

२६ 'कऱ्हाडे ब्राह्मण Business Forum' ची मुहूर्तमेढ

२७ सातारा संस्थेत कोजागिरीनिमित्त 'कुटुंब रंगले काव्यात' चा बहारदार कार्यक्रम



सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

**- संपादक**

संपर्क



## संपादकीय

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे, हे सर्वश्रुत आहे. तो समाजप्रिय असल्यामुळे तो व्यक्ती समूह बनवतो. पुढे हा समूह वाढत वाढत ज्ञातीमध्ये परिवर्तीत होतो अशा ज्ञातीचा धर्म होतो. प्रत्येक ज्ञाती समूह हा आपले हित जपण्यासाठी कार्यरत असतो.

त्या मागे उद्देश हाच की, समाजाने ज्ञाती बांधवांसाठी काही चांगली कामे करून समाजहित साधावे आणि याच भावनेतून कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाची स्थापना झाली आणि माध्यम म्हणून आपण 'संपर्क'ची निर्मिती केली.

गेली आठ वर्षे सतत या त्रैमासिकासाठी आपण विविध संघ कार्य करीत आहोत. याच मालिकेत आपण पुढेही काही चांगले कार्य करणार आहोत, आपल्या संघापैकी काही संघ वधू-वर संस्था चालवीत आहेत. आपले ज्ञाती बांधव व्यवसाय करीत आहेत, या व्यावसायिकांकडे नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत किंवा होत असतात याचा फायदा आपल्या ज्ञाती बांधवांच्या मुलांकरिता मिळाव्यात यासाठी प्रयंत्न करणे, विवाहाच्या सुयोग्य संधी त्यांना उपलब्ध करून देणे आणि अशी अनेक कामे आपण महासंघाच्या आणि संपर्काच्या माध्यमातून करू शकू यासाठी महासंघाच्या अर्धवार्षिक सभेच्या वेळी या विषयावर चर्चा करू आणि निश्चित धोरण ठरवू.

जानेवारी महिन्यात मकर-संक्रांतीचे शुभ पर्व आहे, या निमित्ताने महासंघाचे सर्व सभासद, संपर्कचे सर्व वर्गणीदार आणि जाहिरातदार तसेच शुभचिंतक सर्वांना 'मकरसंक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा.'

धन्यवाद!

## 'बकुळफुले'

# पाऊस मनातला

**डॉ. श्रीकृष्ण जोशी**

सहस्रधारांनी कोसळणाऱ्या पावसात चिंब भिजून रोमरोम धन्य करून घेण्यापेक्षा आडोसा शोधण्यावर भर देणारे आपण. पावसाची चाहूल लागल्यावर छत्र्या रेनकोटचीच काळजी आपल्याला. याचा अर्थ असा नव्हे की चारही महिने पावसात भिजतं रहावं. पण एक तरी सर अनुभवावी असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. शॉवरखाली उभं राहून कृत्रिम धारावर्षाव करून घेण्यापेक्षा नैसर्गिक शॉवरचा मनमुराद आनंद लुटण्यासाठीच तर सृष्टीचं हे कौतुक असतं.

पाऊस ! ज्याचा उच्चारानंसुद्धा मन चिंब भिजून जातं आणि नुसत्या दर्शनानं आत खोलवर गारवा भिनत जातो असा पाऊस ! लक्षावधी जलधारा अविरत कोसळू लागल्यावर धारानृत्याच्या लयबद्ध अविष्कारानं आपण स्तिमीत होऊन जातो. मुसळधार पडणारा, भुरूभुरू पडणारा, सरीवर सरींनी कोसळणारा, अवचित येणारा, उशीर करणारा, रोमांचित करणारा आणि प्रसंगी फजिती करणारा पाऊस. पाऊस झिमझिमणारा सुद्धा आणि रौद्ररूपात वर्षणारा सुद्धा. प्रतिभावंतांच्या सर्जनशीलतेला प्रेरणा देणारा आणि कृषिवलांना साद घालणारा. नवपरिणितांना सुखावणारा आणि जराजर्जरांना आठवणींच्या जगात घेऊन जाणारा. पाऊस!

पाऊस शब्दातलं काव्य केवळ अवर्णनीय! ग्रीष्मानं तापलेल्या भुईवर पाऊस पडू लागला की निर्माण होणारा मृद्‌गंध केवळ विलक्षण. मातीच्या वासानंही पोट भरावं इतकं त्यात सुख. सगळी सृष्टी तजेलदार आणि सदाबहार असल्यासारखी तृप्त.

पण हे वर्णन आपण का ऐकतोय ?

केवळ ऐकण्यावर समाधान मानायचं की कवी अनील यांनी म्हटल्याप्रमाणं पावसाला अलगद तळहातावर झेलून घ्यायचं ? आपणच ठरवायला हवं. सहस्रधारांनी कोसळणाऱ्या पावसात चिंब भिजून रोमरोम धन्य करून घेण्यापेक्षा आडोसा शोधण्यावर भर देणारे आपण. पावसाची चाहूल लागल्यावर छत्र्या रेनकोटचीच काळजी आपल्याला. याचा अर्थ असा नव्हे की चारही महिने पावसात भिजतं रहावं. पण एक तरी सर अनुभवावी असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. शॉवरखाली उभं राहून कृत्रिम धारावर्षाव करून घेण्यापेक्षा नैसर्गिक शॉवरचा मनमुराद आनंद लुटण्यासाठीच तर सृष्टीचं हे कौतुक असतं.

पण एक गंमत असते.

लहान मुलं ज्या निरागसतेनं पावसात भिजण्याचा आनंद लुटतात तसा तितका निरागस आनंद मोठी माणसं नाही लुटू शकत. म्हणजे अगदी मनात असुनसुद्धा. याचं कारण आपल्या भिजण्याकडे निरागसतेकडे इतरांचं लक्ष असतं. आणि त्यांच्या नजरेतले भाव पाहून आपणच ओशाळतो. काय वेडेपणा आहे हा त्यांच्या नजरेतला भाव आपल्याला पटकन उमगतो आणि वय,पद,प्रतिष्ठा विसरून सचैल भिजणारे आपण चटकन पावसातून बाजूला होतो. घरी जातो आणि पावसाकडे खिडकीतून पहात राहतो. पावसावरची अनेक गाणी, कविता, आठवत राहतात. शरीर कोरड्या जागेत असतं आणि मन रमलेलं असतं पावसाच्या वर्षावात.

केवळ पाऊसच नाही तर निसर्गातील अनेक घटकांच्या आनंदाला निसर्ग आणि आपण दुरावा निर्माण होत असतो. निसर्गाशी आपला स्नेहसंबंध त्यामुळंच निर्माण होत नाही. आणि एकादा दुरावा सुरू झाला की अलिप्तता केव्हा कशी ग्रासून टाकते ते कळतंही नाही. पावसाच्या बाबतीत जर सांगायचं झालं तर मग अतिवृष्टी, ढगफुटी याकडं पावसाचं रौद्ररूप म्हणून न पाहता अस्मानी संकट म्हणून पाहण्याची सवय लागते. त्यादृष्टीनं विचार सुरू होतात. अतिवृष्टी वा ढगफुटी हे पावसाचं नैसर्गिक रौद्ररूप आहे. नंतर येणारे पूर, जीवित वा वित्तहानी यामुळं त्याकडं संकट म्हणून पाहिलं जातं. मग खर काय आहे? खरं हे आहे की पडणाऱ्या पाण्याला नैसर्गिकरित्या वाहू देण्यापासून माणूसच आडकाठी करतो. बंधारे घालतो. इमारती बांधतो. नद्यांच्या पात्रांचा संकोच करतो. प्लॅस्टीक, इतर घनकचरा वा जैविक कचरा ठिकठिकाणी टाकून देतो. नैसर्गिक प्रवाहाला हे असे अडथळे सहन होत नाहीत आणि मग त्याचे भीषण परिणाम भोगावे लागतात. पाऊस वाईट नसतोच वाईट आपण असतो. आपल्या वागणुकीचं खापर आपण त्याच्यावर फोडतो. आणि विनाकारण अश्रू ढाळत राहतो. दोष देताना एकच बोट समोर जेव्हा रोखतो तेव्हा इतर बोट आपल्याकडं वळलेली असतात. अशी वळलेली बोटं सरळ करून तळहात पसरून येणाऱ्या पावसाचं स्वागत मनापासून केलं तर खूप काही घडू शकेल आणि खरं सांगू या बरसणाऱ्या पावसाच्या सरी, या ममत्वाच्या निदर्शक असतात. आईची आपुलकी, लडीवाळ निरासगता आणि अभिजात रसिकता म्हणजे बरसणारा पाऊस असतो. आपण स्वच्छ नजरेनं त्याच्याकडे पाहिलं की तो ही स्वच्छ मनानं आपल्यात भिनून जातो. आणि जीवनप्रवाहात अलगदपणे मिसळून जातो.

म्हणून आता पावसाचं स्वागत मनापासून करायलाच हवं नाही का ?



शील हे मनुष्याचे श्रेष्ठ आभूषण आहे.

# काव्यसुमन

## काव्य तिळगूळ

तिळ स्नेहाचा
अन् गूळ मायेचा
खमंग तिळगूळ बनला
आपुलकीचा
साखरेचा पाक म्हणजे
नाविन्याची गोडी
तिळ, खसखस, चुरमुरे
यांची त्यांच्यासंगे जोडी
गोड, घट्ट, कडक, चिवट
हे प्रकार सारे प्रेमाचे
वर्षानुवर्षे टिकतील
असे संबंध तुमचे आमचे
काव्याचा हा तिळगूळ
देताना
भिती नाही सांडायची
शब्द हे उत्तम माध्यम
गोष्ट सांगायला मनीची

**- स्वाती प्रभुदेसाई**
९७६९३२९९९३



## संपर्क मेळावा

जमले या मंदिरी सारे
वाचक
वृध्दींगत व्हावा स्नेहसंपर्क
सभासदांचे विचार मते
अनेक
त्यासाठी लाभले
व्यासपीठ एक
प्रगटावे ते संपर्कात लिहूनी
लेख
होईल मनोरंजनही
प्रबोधनात्मक
त्रैमासिकाचे व्हावे मासिक,
पाक्षिक,
निघावा देखणा असा
'दिवाळीअंक'
समोर ठेवुनी धोरणे
योजना सकारात्मक
उंचावत नेवूया संस्थेचा
'प्रगती आलेख'

**– उषा कशेळकर**
डोंबिवली पूर्व
९८३३४००१७१

VIJAY DIWAKAR DHAVLE
MFA

**CONCEPT PRINTS**

**THE DESIGN STUDIO**

AN AESTHETIC ESSENCE TO ADVERTISING

DOMINATION IN

- Pharmaceutical Product Promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594
Email : vdhavle@rediffmail.com

Tilak Statue, Mahal, Nagpur - 440032

Plot 118, New Dnyaneshwar Nagar,Manewada Road, Nagpur - 440027

**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**

# निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे

**दूरध्वनी : ०२५१-२४५२०५२**

**भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९**

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम. आय. डी. सी., डोंबिवली (पू.)

 जगात जगण्यासाठी कल्पना नव्हे तर प्रत्यक्ष कृतीच मदत करतात.

# ठाणे संस्थावृत्त

**नवीन कार्यकारिणीची नियुक्ती :**

ठाण्याच्या कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या दि. २ जून, २०१२ रोजी पार पडलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नवीन कार्यकारिणीची नियुक्ती करण्यात आली आहे. नवीन कार्यकारिणीत माजी कार्यकारिणी सदस्य व नवीन सदस्य असे संतुलन ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. 'पितांबरी' उद्योगसमुहाचे प्रमुख श्री. रवींद्र प्रभुदेसाई यांना नवे अध्यक्ष म्हणून तर श्री. संजय अंबर्डेकर, यांना उपाध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. कार्यवाहपदी श्री. अभय आठल्ये तर कोषाध्यक्षपदी सौ. माधुरी आठल्ये यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नवीन कार्यकारिणीत श्री. संतोष देव हे सह-कार्यवाह व सौ. रीना आठल्ये या सह-कोषाध्यक्षपदी नियुक्त झाले असून श्री.विनायक शेणोलीकर, श्री. अजित सरवटे, श्री. माधव धामणकर, सौ.माधवी कयाळ व श्री. सचिन ताटके हे कार्यकारिणीचे इतर सदस्य आहेत. नव्या कार्यकारिणीने नवीन सदस्य नोंदणी व संघटना मजबुती, संघाची कायमस्वरूपी वास्तु, निधी संकलन व आर्थिक सक्षमीकरण, विद्यार्थी / युवक / ज्येष्ठ नागरिक / व्यावसायिक यांच्यासाठी वेगळे उपक्रम या उद्दिष्टांवर विशेष भर देण्याचे निश्चित केले आहे.

**सांस्कृतिक कार्यक्रम:**

'सरींवर सरी' हा श्री. विनायक जोशी व सौ. मृदुला दाढे-जोशी यांनी सादर केलेला वर्षाऋतू-गीतांचा कार्यक्रम व मावळत्या कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांचा सत्कार असा सोहळा रविवार दि. १२ ऑगस्ट २०१२ रोजी आयोजित करण्यात आला होता. ठाण्यातील ज्येष्ठ शिक्षक श्री. मुरलीधर गोडे यांनी या समारंभाचे अध्यक्षपद भूषविले. त्यांच्या हस्ते माजी कार्यकारिणीतील पदाधिकार्यांना त्याच्या निर्व्याज योगदानाबद्दल गौरवण्यात आले. माजी अध्यक्ष प्रा. दत्तात्रय बोरवणकर, उपाध्यक्ष श्री. रवींद्र सरदेसाई व कोषाध्यक्ष श्री. नरेश मुळ्ये यांचा या प्रसंगी गौरव करण्यात आला. मात्र याची खंत सर्वांनाच लागून राहिली होती की या प्रसंगी कार्यवाह सौ. सुषमा करकरे या काही कौटुंबिक कारणास्तव उपस्थित राहू शकल्या नाहीत. प्रा. बोरवणकर यांनी अध्यक्षपदाची जबाबदारी गेली २३ वर्षे नेटाने पार पाडली. त्यांच्या अथक परिश्रमामुळेच संघाची घटना, नोंदणी व इतर सर्व कायदेशीर गोष्टींची पूर्तता करणे शक्य झाले. त्यांच्या या भरीव कार्याचा सर्व सदस्यांनी आदरपूर्वक गौरव केला. गेल्या १० वर्षांपेक्षाही जास्त काळ संघाच्या कामाची धुरा ज्यांनी समर्थपणे सांभाळली त्या कार्यवाह सौ. सुषमा करकरे यांच्या कार्याचा विशेष उल्लेख करण्यात आला व सर्व उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचा गौरव केला. संघाचे अध्यक्ष श्री. प्रभुदेसाई यांनी श्री. गोडे यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला. या कार्यक्रमास मुलुंड येथे नुकत्याच स्थापन झालेल्या कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे कार्यवाह श्री. सप्रे व कार्यकारिणी सदस्य श्री. खांडेकर आणि श्री. लघाटे यांचीही उपस्थिती लाभली.

**अभय आठल्ये**
कार्यवाह, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ठाणे.


।। हरिहरेश्वर प्रसन्न ।।

**माऊली बिच रिसॉर्ट**

निवास व न्याहरीची उत्तम सोय
प्रो. सौ.चित्रा किरण वाकणकर
मु.पो. मारळ, हरिहरेश्वर, श्रीवर्धन, जि.रायगड - ४०२११०
(MTDC मान्यता प्राप्त)



www.mauliresot.com
०२०-२२६०४८/६९२९९०
९२२६३७४७३१/९६३७५३९०७५

।। रेशीम गांठी ।।
करिष्मा समोर, कोथरूड, पुणे ३८.
माफक फी, वेबसाईट फ्री
२५४६९१५८ / ९८८११५२७४६
वेळ : सकाळी १० ते १२, सायं. ५ ते ८ बुधवारी बंद
e-mail : info@reshimgathi.com
visit : www.reshimgathi.com
सुखी वैवाहिक जीवनासाठी समूपदेशन

वधू-वर नोंदणी
पत्रिका, भविष्य
आणि
परिचय मेळावे

WITH BEST COMPLIMENTS FROM
**मे. डी.व्ही. भाटवडेकर**
६४०, नारायण पेठ, पुणे ४११ ०३०,
क्लॉथ मर्चंटस्
फोन नं. - २४४५६०४७
१९१७ पासून अहर्निश सेवा




अज्ञानामुळे सुखापेक्षा ज्ञानामुळे झालेले दुःख चांगले.


Nakhye Udyog
लग्न, मुंज, साखरपुडा, सभा, प्रदर्शन, संमेलन व
इतर कार्यक्रमांकरीा सर्व सोयींनी केटरींग सेवेसह
सुसज्ज हॉल
आता वातानूकुलित
शुभमंगल कार्यालय
आणि
एव्हरेस्ट हॉल
शुभमंगल केटरर्स, एव्हरेस्ट शॉपिंग सेंटर लोकमान्य चौक,
फडके रोड, डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१. फॅक्स : २४८३३५१.
फोन : २४३३१९३, ३०९१९००. संपर्क : योगेश - ९३२३१३३१९१.
एव्हरेस्ट केटरर्स, म. गांधी रोड, डोंबिवली (पश्चिम) - ४२१२०२
फोन : २४९२८६४, ३०९१८९७. फॅक्स : २४८३३५१.
संपर्क : उमेश - ९३२२२८३०३८.

# सद्गुणांची पाठराखण महत्त्वाची

**अवधूत हर्डीकर (०२०-२५३८०२०१)**



प्रत्येक प्राणी स्वतंत्र जन्माला येतो. व्यावहारिक ''मी'' ची जाणीव झाल्यापासून त्याचे जीवन स्वतंत्र असते. त्याचे व्यावहारिक जीवन, कार्मिक जीवन, आर्थिक शैक्षणिक, अनुभविक-सांस्कृतिक-वैचारिक-भावनिक...... सर्वच प्रकारचे जीवन, त्याचे स्वत:चे असते, म्हणजे स्वतंत्र असते. या जाणीवांचे परिघ स्व:तला मध्यवर्ती कल्पून असतात. अशा लोकांच्या समाजगटांमध्ये जी एक वैशिष्ट्यपूर्ण जीवनपद्धती काही काळानंतर निर्माण होत राहते, तिला संस्कृती म्हणतात. तसेच छोट्या छोट्या अनेक घरट्यांतूनही दिसणाऱ्या परंपरा त्या समाजाचा जिवंत घटक असतात. त्या स्वतंत्र विकासाला पूरक असायला लागतात.त्या व्यक्तीच्या विकासाला मारक होता कामा नयेत. कारण अशा उत्तमोत्तम विचारांच्या परंपराच समाजातील चांगली व्यक्ती निर्माण करतात आणि अशा व्यक्तींनी बनलेला समाजच आदर्श समाज असतो. आपल्या घटनेने अशी आपापली संस्कृती जपण्याचा समाजगटांचा नैसर्गिक अधिकार मान्य केलेला आहे.

**व्यक्तीला मोठं करणाऱ्या, आंतरिक सद्गुणांवर काळाच्या कसोटीत मोठ्या ठरलेल्या, कर्तबगारीचे स्वत चे विभिन्न परिमाण निर्माण करणाऱ्या आपल्या ज्ञातिबांधवांची ओळख आपण करून घेऊ. त्यामुळे लोकसंख्येच्या दृष्टीने फार छोट्या पण अनेक क्षेत्रात व्यक्तीमत्त्वांचे लखलखतीत मानदंड उभारणाऱ्या आपल्याच लोकांचे पुण्यस्मरण केल्यासारखे होईल हे करणे आवश्यक आहे.**

अशा समाजातल्या व्यक्तींची काही लक्षणीय वैशिष्ट्ये असतात. व्यक्ती नुसती शरीराने वेगळी म्हणून स्वतंत्र असून, जमत नाही, तिचे स्वातंत्र्य, तिच्या आंतरिक गुणांमुळे उठून दिसणाऱ्या वेगळेपणात आहे. तरच तो टिकाऊ उपयोगिता असणारा आणि म्हणूनच घोंघावणाऱ्या वादळातही डौलदारपणे उभा ठाकणारा, काळाला पुरून उरणारा, सर्व प्रकारच्या संकटांवर यशस्वी मात करणारा, व्यक्तीमत्वाचा युनिकनेस, भांडकुदळपणाच्या कलाप्रकाराने मिळवलेला नसतो. तो दांभिकता, खोटारडेपणा, कारस्थाने, क्षुद्र मानसिकतेने अंकुरित झालेली कमालीची फसवेगिरी यांतून विकसित झालेला नसतो. उदात्त अशा अनेक सद्गुणांच्या अनेक वर्षांच्या मशागतीचे अशी व्यक्ती हे फळ असते. त्यात प्रामुख्याने असतो, त्याचा अनुकरणीय साधेपणा, अशा व्यक्तीला स्वत:लाच आपण कोणत्या गुणांनी युक्त आहोत याची कल्पना नसते, आणि हा असा रिफाईंड ग्रेसफुलनेस हीच त्याची ओळख असते. तो जाणण्याची अनोखी क्षमता लाभलेली माणसे सभोवती असावी लागतात. कारण या बाबी, बव्हंशी भोळ्या व अज्ञ समाजात नाटकीय गुणधर्मांचा अवलंब करूनही तात्पुरते मोठे झालेले लोक समाजामध्ये दिसतात. विशेषत: ज्या समाजामध्ये अवलंबितांची संस्कृती फोफावली असते, आणि दुसऱ्या प्रत्येक व्यक्तीचा विचार, ती व्यक्ती माझ्या काय व कोणत्या प्रकारच्या फायद्याची ..... असाच होत असतो. अशा समाजात हे प्रमाण अधिक असते. अशा आंतरिक सद्गुणांमुळे वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तीमत्व लाभलेल्या व्यक्तीच्या गुणांचे कोठेच कोड-कौतुक होताना दिसत नाही. कारण, असे कोड-कौतुक हा सुद्धा अवलंबितांच्या संस्कृतीत एक सोयीने करण्याचा भाग असतो. म्हणून केवळ असा युनिकनेस् असलेली शालीन-सद्गुणी माणसे लाभूनच जमणार नाही. त्या गुणवत्ता, स्वार्थी भावना व अहंकार दूर सारून, ओळखण्याची क्षमता असलेली माणसेही समाजात लागतात. अशा आपल्यामधील क्षमतांचा विकास सतत करीत राहयचा असतो. पालकांना जाणीवपूर्वक आपल्या मुलांमध्ये हा एक मोठा सद्गुण कसा रूजेल या बाबींकडे लक्ष द्यायचे.

या बाबी, समाजघटकांमध्ये केंव्हा तरी अपवादात्मक म्हणून दिसतात, याची कारणेही लक्षणीय आहेत. या सर्वांकरितां मुळात आवश्यक असणारी अंत:स्फुर्ती ही कमालीची अशक्त झालेली असणे, परिस्थिती कमालीची प्रतिकूल असतानांही कांही व्यक्तींजवळ उदात्त-मानवतेचे सद्गुण, कोणी शिकवल्याशिवायही कसे येतात याबद्दलच्या वैचारिक क्षमतांची गरिबी असणे, व्यवहारामध्ये पूर्ण रूतल्यामुळे पालकांच्या चांगल्या परिस्थितीमुळे प्राप्त झालेले शिक्षण, त्याच्या जोरावर मिळवलेली नोकरी आणि या दोन्हीमुळे आलेली पैशाची ताकद आणि त्या ताकदीच्या भरवंशावर बेतलेला अहंकार, यांमुळे दुसऱ्या प्रत्येक व्यक्तीकडे गरीब-बिचारे म्हणून पाहण्याची करून घेतलेली सवय, या सर्वांमुळे एखाद्या गोष्टीच्या अचिवमेंटसाठी आपल्या अंगी कोणते मूलभूत सद्गुण असावे लागतात याची कल्पनाही नसणे याचा परिणाम, स्वार्थत्यागपूर्वक निरपेक्ष सेवापरायणता असलेल्या व्यक्तींची ओळखच अशा लोकांना होण्याची त्यांची पात्रता नसणे यात होतो.

या सर्वांचा परिणाम, सद्गुणी आणि योग्य-सुयोग्य व्यक्ती, रचनात्मक अशा समाजोपयोगी आणि सार्वजनिक कार्य करणाऱ्या संस्थांच्या व्यवहारात अभावानेच दिसण्यात होतो आणि मग अशा संस्थांच्या आधाराने असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या सावल्या मोठ्या वाटू लागतात. स्वार्थत्यागपूर्वक निरपेक्षपणे कांही ध्येय पुढे ठेवून, कार्य करणाऱ्या व्यक्तींमुळेच संस्थांची भरभराट होत असते. असा संस्थारूपी वृक्षांवर स्वत ची घरटी बांधण्याच्या हव्यासापोटी त्या वृक्षाला मात्र अवकळा येते.

व्यक्तीला मोठं करणाऱ्या, आंतरिक सद्गुणांवर काळाच्या कसोटीत मोठ्या ठरलेल्या, कर्तबगारीचे स्वत चे विभिन्न परिमाण निर्माण करणाऱ्या आपल्या ज्ञातिबांधवांची ओळख आपण करून घेऊ. त्यामुळे लोकसंख्येच्या दृष्टीने फार छोट्या पण अनेक क्षेत्रात व्यक्तीमत्त्वांचे लखलखतीत मानदंड उभारणाऱ्या आपल्याच लोकांचे पुण्यस्मरण केल्यासारखे होईल हे करणे आवश्यक आहे.

अशा समाजाचा एक विशेष असा असतो कीं, अशांची कर्तबगारी सर्वदूरवरच्या भागात सहज स्वरूपात उठावदारपणे लोकांपुढे येते. समाधी घेऊन शंभर वर्षे लोटल्यावरही ज्यांच्या संबंधीचा आदरभाव वृद्धिंगतच दिसतो असे महायोगी ब्रह्मीभूत श्री वासुदेवनांद सरस्वती टेंब्ये स्वामी महाराज, बाळशास्त्री जांभेकरांसारखे नऊ-दहा क्षेत्रांमध्ये प्रथम असलेले, वा.गो. चिरमुले यांचे सारखे पहिली विमा कंपनी आणि बँक स्थापन करणारे, भारतीय रेल्वेचा हिरा म्हणून स्वर्गीय लालबहादूर शास्त्री यांनी गौरविलेले धातुविद्या विशारद डॉ. आर. जी. भाटवडेकर, भारतीय रेल्वेचे

पहिले कमिशनर सी.एम. बखले, पहिला स्वरभास्कर भास्करबुवा बखले, मराठीला पहिले ज्ञानपीठ ज्यांच्यामुळे मिळाले असे श्री. विष्णू सखाराम खांडेकर अशांसारख्या विभिन्न क्षेत्रामध्ये आपल्या व्यक्तीमत्त्वाचा दीर्घ–प्रदीर्घ काळाकरता ठसा उमटविणाऱ्या, ज्ञातिबांधवांची संख्या शतकावर गेलेली महाराष्ट्रात ऐकू येते. पण महाराष्ट्राबाहेर आपल्या अनेक लोकांनी स्वत:ची नाम–मुद्रा अनेक जनहितकारी–स्वार्थत्याग–पूर्वक केलेल्या कार्यांमुळे प्रदीर्घ काळासाठी काळाच्या पडद्यावर ज्यांनी उमटविली असेही संख्येने प्रचंड आहेत.

''हितवाद'' या कलाकत्त्याहून प्रसिद्ध होणाऱ्या बंगाली वृत्तपत्राचे संपादक होते, श्री. सखाराम गणेश देऊस्कर बनारसहून प्रसिध्द होणाऱ्या ''आज'' या हिंदी भाषेतल्या दैनिकाचे संपादक होते, श्री. बाबुराव पराडकर, भारतरत्न पं. गोविंद वल्लभपंत पराडकर यांचे घराणे राजापूर तालुक्यातील मूळचे कोतापूरचे. अडीचशे वर्षापूर्वी गढवाल येथे स्थायिक झालेले, त्यावेळच्या विशाल उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री म्हणून असलेले पं. गोविंद वल्लभपंत, त्याचवेळी विशाल मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री बॅ. बाळासाहेब खेर, आणि त्याचवेळी लोकसभेचे पहिले सभापती श्री. गणेश वासुदेव मावळंकर ही तिन्ही व्यक्तीमत्वे रत्नागिरी–राजापूर या लगतच्या भागात मूळ असलेली कऱ्हाडा समाजाची होती. हिंदी पत्रकारितेत जे त्रिमुनी तीन–ऋषी म्हणून प्रसिध्द आहेत, त्यातले दोघे बाबुराव पराडकर आणि लक्ष्मण नारायण गर्दे, हे कऱ्हाडा होते. देऊस्करांचे हे शिष्य संपादकाचार्य म्हणून हिंदी पत्रकारितेत गौरविले गेले. राजस्थानमधल्या कोटा येथे, राष्ट्रदूत या हिंदी दैनिकाचे संपादक श्री. आनंद लक्ष्मण खांडेकर यांनी ही परंपरा काल–परवापर्यंत चालवली. सागर–झांशी–करोग्राम इथले संस्थानिक म्हणून क्रमाने खेर, नेवाळकर, हळबे ही घराणी गाजली. झांशीची रण–शूर लक्ष्मीबाई ही गाजलेली कऱ्हाडा स्त्री. ग्वाल्हेरचे दिमाखदार संगीत विद्यालय उभे करणारे पं. गुण्ये, साहित्य आणि अध्यात्मासाठी प्रसिद्ध असलेले तांबे घराणे, ग्वाल्हेरचे प्रा. नारायण कृष्ण शेजवलकर आणि त्यांचे पुत्र विवेक हे ग्वाल्हेरचे महापौर होते व आहेत. गुणा इथले प्राख्यात सर्जन ताटके. इंदोरचे सरवटे आणि मोघे ही घराणी. कानपूरचे प्राख्यात इतिहासकार श्रीनिवास हर्डीकर यांचे घराणे, जबलपूरचे नवाथे, गोळविलकर, सागरचे सीतारामपंत खेर, हे उत्तर प्रदेश विधानसभेचे अध्यक्ष होते. सागरचेच सुधारकराव मुळ्ये, चांदोरकर–सुभेदार, जायदे, हर्डीकर ही घराणी कर्तबगार म्हणून प्रसिद्ध आहेत. इंदूरची करकरे, सरवटे, भवाळकर, मोघे ही प्रसिद्ध व्यक्तीमत्त्वांना जन्म देणारी घराणी. आजही इन्दूरचे महापौर मोघे आहेत. मुकुंद सखाराम नेवाळकर हे मध्यप्रदेश विधानसभेचे अध्यक्ष होते. पद्मभूषण शालिनीताई मोघे यांचे शिक्षण क्षेत्रात मोठे कार्य आहे. मराठी काव्याला पुलकित करणारी तरल भाववृत्ती, तसेच आशयघनता, गेयता, ओजस्विता, वैचारिक, समृद्धी, अशा अनेक गुणसंपदेने मराठी कवितेला ऐश्वर्यसंपन्न करणारे भास्कर रामचंद्र तांबे ग्वाल्हेरचे, काळेले हेही ग्वाल्हेरचे, मध्यप्रेदशाचे ख्यातनाम प्रशासक हेमचंद्र खांडेकर हे पार्लमेंटरी सेक्रेटरी होते. लक्ष्मण आत्माराम काटदरे हे कम्युनिस्ट पार्टीचे मान्यवर पुढारी आणि सरदार श्री. माधवराव किबे हे इंदोरचे. पद्मभूषण व्ही.एम. सरवटे हे भारतीय घटना समितीचे एक मान्यवर सभासद होते. अलाहाबादचे पित्रे, शेजवलकर, तांबे ही मोठी घराणी आहेत. पं. वासुदेव भट्ट कोवई, पं. भैरवभट्ट कोवई, पं. नारायण भट्ट आर्ड्ये, पं. कृष्णंभट्ट बखले, पं, सप्रे ही राजापूर–लांजा भागातून बनारसला स्थायिक झालेली घराणी आपल्या लखलखीत पांडित्यामुळे इ.स. १०३० पासून कालपरवापर्यंत बनारसच्या पंडित सभेमध्ये आपल्या करितां मानाचे स्थान मिळवलेली घराणी. कोणत्याही निर्णय–पत्रावर यांची सही आवश्यक असे. हिमाचल प्रदेशात संन्यस्त वृत्तींच्या डॉ. इंदुताई टिकेकरांचे सामाजिक–सांस्कृतिक कार्य एवढे मोठे आहे कीं, पुणे येथे २८ ऑगस्ट २००० या दिवशी सामाजिक कार्यकर्ते सुंदरलाल बहुगणा, यांनी सांगितले कीं, महाराष्ट्र आजही जिवंत आहे हे आम्हांला इंदुताईमुळे कळते. इंदुताई मूळच्या कोल्हापूरच्या त्या सभेत मी एक श्रोता होतो.

स्वातंत्र्यपूर्व काळात राजापूरच्या पाध्ये गुर्जरांपैकी एकाने कराचीला वेद–संस्कृत पाठशाळा काढली होती. बनारसला सप्रे यांची पाठशाळा होती. काशी नागरी प्रचारणी सभेचे माधवरावजी सप्रे हे रायपूरचे प्राख्यात सप्रे घराण्यातले. न्यायदानाच्या क्षेत्रात जस्टीस तांबे, जस्टीस मुळ्ये, पिता–पुत्र, जस्टीस हर्डीकर, जस्टीस देव, जस्टीस गोळविलकर, सुप्रीम कोर्ट जस्टीस प्रकाश नावेलकर, यांतील खूपशी घराणी मध्यप्रदेश व उत्तर प्रदेशातली, विलक्षण प्रतिभाशाली. पुरूषोत्तम मावळंकर हे अहमदाबादचे, के.सी. पंत हे पं. गोविंद वल्लभ पंतांचे चिरंजीव. आजही स्वानंद किरकिरे–तरल कल्पनांचा भावुक कवी म्हणून हिंदी काव्य–गीतांच्या प्रांतात नांव करून आहे. कलकत्त्याचे श्रीकांत बाक्रे उत्तम गवई म्हणून प्रसिद्ध होतेच. तसेच इंदोरचे उदय भावाळकर ध्रुपद धमार गायकी प्रकारात प्रसिद्ध आहेत. उज्जयिनीचे पद्मभूषण विष्णूपंत वाकणकर यांनी सरस्वती नदीचा शोध लावला. श्री. गोविंदराव नानल हे हैद्राबाद कॉंग्रेसचे नेते व निजामाविरूद्धच्या चळवळीचे नेते होते. इंदोरचे विष्णूपंत चिंचाळकर, ख्यातनाम नाट्यकर्मी. तुषार खांडेकर, दमयंती तांबे, करकरे हे क्रीडांगण गाजवत आहेत. दिल्ली लोकसभेचा मावळंकर हॉल, भोपाळचे माधवराव सप्रे म्युझियम, ग्वाल्हेरचे गर्दे स्मारक, बंगलोरचा हर्डीकर स्क्वेअर, झाशीच्या राणीची ठिकठिकाणी स्मारके, काशीचे बाबुराव पराडकर भवन, अशांसारखी कऱ्हाडा व्यक्तीमत्वांची अनेक स्मारके त्यांच्या सद्गुणांच्या राशींमुळे निर्माण झाली. हैद्राबादची विवेकवर्धिनी हे सातवळेकर व नानासाहेब हर्डीकरांच्या कार्याचे स्मारकच आहे.

सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यातून राहणाऱ्या आपल्या अनेक पूर्वजांनी आपल्या कर्तबगारीसाठी नवीन क्षेत्रे भारताच्या सर्व दिशांमध्ये धुंडाळली यांची नावे अनेक प्रसंगी वर येत रहातात. तुम्ही केरळ–कर्नाटक–आंध्र–तामिळनाडू कोठेही जा. तुम्हाला ही ठसठशीत नांवे, आपल्या आखीव–रेखीव–नीटस संस्कृतीची ओळख देतील. केरळच्या कासारगोड जिल्ह्यातील आगलपाडी–पदरेसारखी अनेक गांवे कऱ्हाड्यांच्या सद्गुणांनी भरलेली आहेत. पदरे या गावांत एकशेपाच घरे भट या एकाच अडनावांची विभिन्न सात गोत्रातल्या कऱ्हाडा समाजाचीच आहेत. ही अशी माहिती आपणांस www.thekarhaada.org या वेबसाईटवर मिळेल. देश–विदेशातले शेकडो कऱ्हाडा आपल्यासंबंधी माहिती या वेबसाईटवरून मिळवीत आहेत. ही वेबसाईट श्री. अवधूत हर्डीकर व सचिन ताटके यांनी सर्व कऱ्हाडा समाजाकरितां त्यांचे माहितीसाठी निर्माण केली आहे. आपणही कृपया अशांसारखी सर्व माहिती या वेबसाईटवर मिळवावी आणि आपल्या संस्कृतीचा तसेच आपल्यामधल्या सद्गुणी व्यक्तीमत्वांचा परिचय करून घ्यावा. या सर्व आपल्यामधल्या सद्गुणांचा, आपल्यामध्ये बाणविण्यासाठी विकास करावा आणि प्रत्येक काळाच्या टप्यात आपले नांव करणारी आपल्यामधली पारंपरिक क्षमता राखण्यासाठी प्रयत्नशील असावे.

या सर्वांचा आम्हांला अभिमान आहे. कारण सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीत स्वत:च्या भूमीतून दूरवर–लांबवर जाऊन यांनी तलवार गाजवली– संस्कृती राखली–ज्ञातीच्या कर्तबगारीला विभिन्न आयाम दिले आणि हे सर्व कट–कारस्थाने न करता, निंदा–घृणा–मत्सर–तिरस्कार यांसारख्या स्वत: लाच उणे करणाऱ्या घाणेरड्या संस्कृतीचा अवलंब न करतां, दुसऱ्याचे यश–मानमरातब, संपत्ती, किर्ती स्वत: चे नांवावर खपवण्याचे पाप न करतां, खऱ्या सच्छित ब्राह्मणांच्या सद्गुणांची पाठराखण करून त्यांनी हे संपादले.

यांचा अभिमान नाही बाळगायचा तर कोणाचा ?

यांना वंदन नाही करायचे तर कोणाला करायचे ?

# विविधज्ञ कऱ्हाडे

**श्रीपाद दामोदर सप्रे. ९८१९८११३९१**

यादवांचे पंतप्रधान हेमाडपंत हे कऱ्हाडे होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे राजपुरोहित केशव पंडीत पुरोहित, बाजीराव पेशव्यांचे मंत्री गोविंदपंत खेर, शाहू महाराजांचे मंत्री चिमणाजी दामोदर मोघे, माधवराव पेशव्यांचे गुरू आणि सल्लागार महादजीपंत करकरे तसेच विसाजीपंत बिनिवाले-चिंचाळकर हे सर्व कऱ्हाडेच होते. मातीच्या ढेकळाला हात लावील तर त्याचे सोने करील आणि लाकडाच्या ओंडक्याला हात लावील तर त्याचे पोलाद बनवील अशी अद्भूत कियमागार, ब्रिटिशांचा दुटप्पीपणा वेशीवर टांगणारी पहिली भारतीय संस्थानिक, वैधव्यानंतर केशवपनासारखे निर्बंध दूर सारणारी स्वयंभू स्त्री कसलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांना युध्दनेतृत्वाने जेरीस आणणारी, असंख्य भारतीय क्रांतीकारकांची स्फूर्ती देवता - झाशीची राणी लक्ष्मीबाई ही कऱ्हाडेच होती. बंधुभगिनिंनो, किती नावे घ्यावीत ? हीच परंपरा पुढेही सुरू राहिली. भारताचे गृहमंत्री भारतरत्न पं. गोविंद वल्लभपंत पराडकर, पद्मविभूषण बाळासाहेब खेर जे त्यावेळच्या मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होते. तसेच इंग्लंडमध्ये उच्च आयुक्तपदावर होते. बाळासाहेब खेर यांनी भारताची घटना तयार करताना आपले बहुमूल्य योगदान दिले होते. तसेच लोकसभेचे पहिले अध्यक्ष दादासाहेब मावळणकर. आजही प्रकाश जावडेवर, खासदार मधुकर सरपोतदार, आमदार नितीन सरदेसाई अशा अनेकांच्या रूपाने ही परंपरा सुरूच आहे.

न्यायदानाच्या पवित्र अशा क्षेत्रातही न्यायमूर्ती सरवटे, न्यायमूर्ती तुळजापूरकर, न्यायमूर्ती तांबे, न्यायमूर्ती देव, न्यायमूर्ती गोळवलकर, न्यायमूर्ती हर्डीकर, अशी असंख्य नावे आपल्याला दिसतील. याच निस्पृहतेने आणि निडरपणे कर्नल अनिल आठ्यले, वीरचक्र पुरस्कार प्राप्त अरूण देऊस्कर, रिअर ॲरमिरल सुदर्शन श्रीखंडे असे अनेक लोक आज सैन्यदलात राहून भारतभूमीची सेवा करताना दिसतात. देशाच्या सीमेचे रक्षण करणाऱ्या मंडळींबरोबरच देशाच्या अंतर्गत सुरक्षेची काळजी वहाणारे ॲडीशनल डायरेक्टर जनरल ऑफ पोलिस श्री. जयंत उमराणीकर, जॉईंट कमिशनर हेमंत करकरे, असिस्टंट कमिशनर राजन काटदरे, ॲडीशनल कमिशनर विवेक फणसळकर अशा अनेकांनी योगदान आणि बलिदान दिलेले आहे.

बंधु आणि भगिनिंनो, व्यवसायाच्या बाबतीतही आपण मागे नाही. पद्मभूषण शंतनुराव किर्लोस्कर आणि पुढे त्यांच्या कुटुंबीयांनी अनेक कंपन्यांचे जाळे निर्माण केले. विको वज्रदंतीचे गजाननराव पेंढारकर, धूतपापेश्वरचे रणजित पुराणिक, पितांबरीचे रवींद्र प्रभुदेसाई, लिम्का रेकॉर्ड पुस्तकात नोंद झालेले शरदचंद्र सरवटे, सांडू ब्रदर्स, व्यायामशाळेचे जाळे तयार करणारे तळवळकर बंधू, लोणची आणि मसाल्याचे व्यापारी ठाकूर बंधू असे अनेक कऱ्हाडे व्यावसायिक आज आपल्याला दिसतात. कऱ्हाड्यांना जन्मजात चवीचे ज्ञान असते असे म्हणतात त्यामुळे खाद्य संस्कृती जपणारे पणशीकर, तांबे, सरपोतदार, पातकर आणि गावोगावी -इतर शहरातून लहान मोठी हॉटेल्स चालवणारे असंख्य कऱ्हाडे हेच सिध्द करतात की चवीने खाणार त्याला कऱ्हाडे देणार.

जी गोष्ट व्यवसायाची तीच गोष्ट आस्थापनांमधल्या उच्च पदांची. कऱ्हाडे बांधव अनेक कंपन्यांमध्ये अधिकारपदे भूषवीत होते आणि

(क्रमश:)


**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**




**कोंकण काजू**

**उत्पादक :**

कोकण काजू सांडगी मिरची

फणस-तळलेले गरे काजूकतली

**प्रा. सौ. मृणालिनी विजय फणसळकर**

मु. पो. - आंगले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

फोन. : ९४२२२९६५५३, ०२३५३-६५६२५१


**हरवला आहे**

अजिंक्य दि. २० जुलै २००९ पासून आकुर्डी स्टेशन येथून घरी येण्यास निघाला असता स्टेशनवरून बेपत्ता आहे. तो पिंपरी चिंचवड इंजीनिअरींग कॉलेज येथे प्रवेशयादी पहावयास गेला होता.


कोणालाही आढळल्यास संपर्क

श्री. अभय द. किराणे ९५५२५२०३६२

सौ. मंजुश्री अ. किराणे ९५५२५३०३१६

सौ. तृप्ती उपाध्ये ९५५२५३०२२६

सौ. भक्ती देशमुख ९४२२२०८९९१



**चि. अजिंक्य अभय किराणे**



तुम्ही आज जे करु शकला ते उद्यावर ढकलु नका.

*With Best Compliments from,*

**Reindeer Apparels**

for
jerkins and jackets

**Manini Gurjar**

1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002

**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com

**With Best Compliments**

# Dynamic Engineers

**7/2 Behind K.E.B Power Station**
**Udyambag – BELGAUM**
**590008**

**CMFRS. mechanical**
**(Railway) Jacks**

**P.M. Puranik**
**09448480607**

# सातारी पेढा शॉप



संस्थापक
कै. वासूदेव महादेव जावडेकर

स्थापना-१९३६

**मशहूर**

सातारी पेढे
काजू बर्फी
आंबा बर्फी
गुलकंद बर्फी
श्रीखंड वडी



**चटकदार**

फरसाण
स्पेशल चिवडा
सुकामेवा
खारा काजू
चटणी वगैरे

श्रीखंड आणि चक्का

## पौष्टीक खाद्य भांडार

अभ्यंकर रोड, सीताबर्डी, नागपूर–440012, फोन : 0712–2525704



आपला मुलगा/मुलगी
देशाबाहेर आहे का ?
**इंटरनेट** वरून
त्यांना संपर्क करताना
त्रास होतो ?

आम्हाला कॉल करा
आम्ही आपला त्रास
स्वस्त दरात कमी करू.



**SDS ENTERPRISES**

**Sales**
- Desktop
  a. Branded
  b. Assembled
- Laptops
- Tables
- Printers
- Accessories

**Repairs**
- Desktop
- Laptop
- Accessories

**Solutions**
- On Internet
- Network
- Web
- Annual Maintenance
  a. Desktop
  b. Laptops
  c. Network
  d. Printers

**संपर्क**
**Shantanu Gurjar**
**9890990112**
**9326209282**
shantanu@sdsenterprises.net

**ऋणानुबंध घराण्यांचे, संस्कार पिढ्यान् पिढ्यांचे**

(व्यवस्थापन)

# श्री अन्नपूर्णा केटरर्स

(समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या मालकीचे)

# श्रुति मंगल कार्यालय

आमचे मार्गदर्शक व आमचे सद्गुरू

**।।श्री दिगंबरदास महाराज।।**

यांच्या आशिर्वादाने श्रुति मंगल कार्यालयानं मंगल कार्याची परंपरा निर्माण केली व जपली आहे. विवाह, मौंजीबंधन अथवा कोणताही समारंभ या सर्वांतून दृग्गोचर होते घराणे व सुसंस्कृतपणा हा समारंभ संपन्न करणाऱ्या परिवारांचा. अशा साजऱ्या होणाऱ्या समारंभासाठी सुयोग्य वास्तू उपलब्ध करून देणे जिला असेल पावित्र्य मंदिराचे, जेवण असेल अन्नपूर्णेचे, सौंदर्य असेल वास्तूरचनेचे, सुख असेल आधुनिकतेचे हेच श्रुति मंगल कार्यालयाचे ‘ध्येय’. बाकी कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच.

## मंगल कार्यासाठी दोन स्वतंत्र हॉल

**दुर्गा हॉल** : पहिला मजला – ३६०० चौ. फुट

वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या

**जानकी हॉल** : दुसरा मजला – ३६०० चौ. फुट

वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या (टेरेस १००० चौ. फुट)

सर्व खोल्या सेल्फ कन्टेन्ड, प्रशस्त पार्किंग, हवेशीर, भरपूर उजेड, मध्यवर्ती, उत्कृष्ट भोजन, उत्तम वाढप व्यवस्था, लिफ्टची सुविधा, शिवाय दोन मोठे जिने हे सर्व अत्यंत वाजवी दरात

# श्री अन्नपूर्णा केटरर्स

श्री. प्रभाकर र. काजरेकर

# श्रुति मंगल कार्यालय

१२३६, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११ ००४

दूरध्वनी : ०२०–२५५३१७४९, २५५२१४४० फॅक्स : ०२०–२५५२१९९८

Website : www.shrutimangal.com E-mail : hrishikesh@shrutimangal.com



तिरस्कारामुळे झालेली जखम स्मितहास्यामुळे भरुन निघते.

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ - पुणे संस्थेचा
## कोजागिरी-दिपोत्सव वृत्तांत व रक्तदान शिबीर कार्यक्रम

**श्री. दत्तप्रसाद सावकार**




**श्री शरद जांभेकरांचे मंत्रमुग्ध करणारे गायन.**

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे यांच्या तर्फे नोव्हेंबर महिन्यात कोजगिरी पौर्णिमा व दिवाळी निमित्त खास कार्यक्रम कोजागिरी दीपोत्सव आयोजीत केला होता. हा कार्यक्रम ०७ नोव्हेंबर रोजी श्रुति मंगल कार्यालय येथे साजरा झाला. कार्यक्रमाची वेळ सायंकाळी ५.३० ते ८.३० अशी होती.

५.३० ते ६.०० या वेळेत संघातर्फे सर्व सभासद व आमंत्रितांसाठी दुग्ध प्राशनाचा बेत ठरवला होता त्याचा सर्वांनी आस्वाद घेतला.

या नंतर श्री. शरद जांभेकर आणि सहकलाकार यांचा गायन वादनाचा कार्यक्रम जवळजवळ दीडतास चालला. ज्येष्ठ कलाकार श्री. शरद जांभेकर हे संगीत रंगभूमीवरील प्रसिद्ध नट आहेत. त्यांनी शास्त्रीय संगीत, नाट्यगीते इत्यादी सादर करून श्रोत्यांना तृप्त केले. त्यानंतर सुपुत्र श्री. प्रमोद जांभेकर यांचे एकल (solo) व्हायोलीन वादन केले. त्यांनी व्हायोलीनवर वेगवेगळी गाणी सादर करून श्रोत्यांची वाहवा मिळवली. या कार्यक्रमांत तबल्यावर श्री विद्यानंद देशपांडे यांनी साथ केली तर हार्मोनियमवर होते श्री. संजय गोगटे. सर्व कलाकारांचा सत्कार संघाचे अध्यक्ष श्री. गणेश गुर्जर व उपाध्यक्ष श्री गोपाळ भाटवडेकर यांच्या हस्ते श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. या कार्यक्रमाची सांगता सुपौत्री कु. मुग्धा जांभेकर यांनी सादर केलेल्या पसायदानाने झाली.

याच कार्यक्रमात चि. आदित्य जितेंद्र किंजवडेकर (सभासद श्री. भास्कर किंजवडेकर यांचे नातू) याचा सत्कार करण्यात आला. डॉ. होमी भाभा,




**श्री प्रमोद जांभेकर कार्यक्रम सादर करताना.**

बालवैज्ञानिक स्पर्धा, मुंबई यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेत, ज्यामध्ये महाराष्ट्रातून ४०००० च्या वर स्पर्धक होते. त्याने रौप्यपदक पटकावलं. व 'बाल शास्त्रज्ञ' हा बहुमान मिळवला.

त्याचप्रमाणे कु. मानसी मोघे ही मॉस्को मध्ये ९/११/२०१३ रोजी होणाऱ्या विश्वसुंदरी स्पर्धेत Femina-Miss India २०१३ तर्फे सहभागी झाली होती. तिलाही शुभेच्छा देण्यात आल्या.

संघाचे कार्यवाह श्री. लक्ष्मीकांत देसाई यांनी आभार प्रदर्शन केल. त्यांनी देणगीदारांची नावे वाचून त्यांना देणगीबद्दल धन्यवाद दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघाचे कोषाध्यक्ष श्री. दत्तप्रसाद सावकार यांनी केले. या कार्यक्रमाला ३०० च्या वर सभासद उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर सशुल्क पण सवलतीच्या दरात भोजनाची व्यवस्था केली होती. त्याचा लाभ सभासदांनी घेतला.

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे आणि जनकल्याण रक्तपेढी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २४/११/२०१३ रोजी संस्थेच्या कार्यालय परिसरांत रक्तदानशिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी दहा वाजल्यापासून दुपारी एक वाजेपर्यंत रक्तदान शिबिर सुरू होते. संस्थेचे सभासद आणि युवा सभासदांनी रक्तदान केले, या शिबिरास एकूण २३ जणांनी अनुकूलता दर्शविली आणि जनकल्याण पेढी तर्फे सर्व रक्तदात्यांना माहिती देण्यात आली व हिमोग्लोबीन, वजन व रक्तदाब तपासून जे रक्तदाते योग्य आहेत अशांना रक्तदान करण्यास मुभा देण्यात आली.

कऱ्हाडे ब्राह्मण संघातर्फे प्रथमच हे



**परितोष भाटवडेकर व दिपक भडकमकर रक्तदान करताना.**

शिबिर आयोजित केले होते आणि त्यासाठी 'अनिश प्रासाद अपार्टमेंट'च्या कार्यकारी मंडळाने पार्किंगची जागा उपलब्ध करून दिली. त्याचप्रमाणे विश्वस्तमंडळातील सर्व विश्वस्त यांनी परिश्रम घेऊन शिबिर यशस्वी केले. या कार्यक्रमाचे संयोजन अध्यक्ष श्रीगणेश गुर्जर आणि उपाध्यक्ष श्री. गोपाळ भाटवडेकर यांनी केले होते.

जनकल्याण रक्तपेढी तर्फे कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणेचे गौरवपत्र देऊन सन्मानपूर्वक कौतुक केले.

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नाशिक संस्थेमध्ये कोजागिरी पौर्णिमा साजरी

**अध्यक्ष - नरेंद्र ताटके**

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नाशिक तर्फे दि. २२ आक्टोबर २०१३ रोजी सायं ७.०० वाजता समर्थ मंगल कार्यालयातील सभागृहात कोजागिरी पौर्णिमेचा कार्यक्रम पार पडला. या निमित्त नाशिक येथील ख्यातनाम गायक आणि एस. एम. आर. के. महाविद्यालयाच्या संगीत विभागाचे डीन श्री. अविराज तायडे आणि वैद्य श्री. विजय कुलकर्णी यांनी ''राग आणि रोग'' हा कार्यक्रम सादर केला.

शास्त्रीय संगीताचा आपल्या शरीरावर होणारा परिणाम, शरीराच्या निरनिराळ्या व्याधींवर आणि रोगांवर उपचार करण्यासाठी संगीतातले कोणकोणते राग क्रियाशील आहेत याचे उदाहरणांसह शास्त्रीय विवेचन या कार्यक्रमात श्री. तायडे आणि श्री. कुलकर्णी यांनी केले. आपल्या शरीरात एकूण सात चक्रे असून ती आपल्या शरीराला चेतना देत असतात. तसेच आपल्या शरीरात एकूण २२ नाड्या असून चैतन्याचा संचार त्यांच्यामुळेच होत असतो. तद्वतच संगीतात एकूण मुख्य सात स्वर आणि २२ श्रुती असतात आणि यामुळे शास्त्रीय संगीतात निरनिराळ्या रागांची रचना झालेली असते. प्रत्येक रचनेमुळे झालेला राग निश्चितपणे कुठल्यानकुठल्या व्याधींवर किंवा रोगासाठी उपायकारक असतो, असे निवेदन श्री. तायडे यांनी काही राग प्रत्यक्ष गाऊन स्पष्ट केले. यमन राग हा मनातील ताणतणाव नष्ट करून प्रसन्नता वाढवतो. त्याचप्रमाणे राग हिंडोल हा वीररसप्रधान राग शरीराला आलेली मरगळ दूर करून उत्साह वर्धन करतो. भैरवी राग माणसाला अंतर्मुख करून मनाची एकाग्रता वाढवतो. हे निरनिराळे राग त्यांनी उत्तम रितीने सादर केले आणि खरोखरीच त्यांनी वर्णन केलेला परिणाम जाणवल्यासारखा वाटला.

श्री. तायडेंसोबत वैद्य श्री. विजय कुलकर्णी यांनीही राग गाऊन त्यांना सोबत केली. त्याचप्रमाणे तबल्यावर श्री. नितीन वारे, संवादिनीवर श्री. योगेश रसाळ आणि तानपुऱ्यावर श्री. आशिष रानडे यांनी साथ केली.

याच कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा त्यांच्या कार्यासाठी आणि विद्यार्थ्यांचा त्यांनी परीक्षेत मिळविलेल्या यशासाठी सत्कार व गुणगौरव करण्यात आला. याअंतर्गत वैद्य श्री. स्वानंद पंडित, सौ. सुप्रिया फणसळकर व इतर अनेक विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यंदा या कार्यक्रमासाठी आपल्या ज्ञातीतील तरूण पिढीने पुढाकार घ्यावा असा विचार होता. त्या प्रमाणे या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन तरूण कार्यकर्त्यांनी उत्कृष्टपणे आणि उत्साहाने केले ही एक जमेची बाजू.

गायनाच्या कार्यक्रमानंतर सहभोजन आणि मसाला दूध याची व्यवस्था केली होती. त्याचा पुरेपूर आस्वाद कार्यक्रमाला आलेल्या मंडळींनी घेतला.

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, नागपूर संस्थेमध्ये

**आनंद पराडकर**

## पुस्तक विमोचन, कऱ्हाडे ज्ञाति गुणवंत विद्यार्थी सत्कार व कोजागिरी उत्सव

दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षी सुद्धा कऱ्हाडे ब्राह्मण संघाचा ८४ वा कोजागिरी उत्सव कार्यक्रम रविवार दि. २० ऑक्टोबर २०१३ रोजी संपन्न झाला. ह्या वर्षीच्या कोजागिरी उत्सवाचे आकर्षण म्हणजे ज्ञातिबांधव व सेवानिवृत्त मुख्य अभियंता मा. श्री. सुहास खांडेकर यांच्या 'अनुबंध' ह्या आत्मचरित्राचे विमोचन होय.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्य अतिथी सेवानिवृत्त प्राचार्य श्री. अरविंद खांडेकर ह्यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने व कु. रचना खांडेकर हिच्या ईशस्तवनाने झाली. संघाचे अध्यक्ष श्री. आनंद पराडकर ह्यांनी प्रस्तावनेत संघ ज्ञातिबांधवांसाठी राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती सादर केली.

कु. प्रणोति पराडकर हिने मुख्य अतिथि प्राचार्य श्री. अरविंद खांडेकर व 'अनुबंध' ह्या आत्मचरित्राचे लेखक माजी मुख्य अभियंता श्री. सुहास खांडेकर ह्यांचा परिचय करून दिल्यावर दोघांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

श्री. सुहास खांडेकर ह्यांनी आपल्या भाषणात आत्मचरित्र लिहिण्यामागची प्रेरणा विषद करून शासकीय सेवेत असल्याने विदर्भ, मध्यप्रदेश व छत्तिसगढ भागांमध्ये काम करावे लागल्यामुळे विविध प्रकारचे अनुभव मिळाल्याचे सांगितले. त्याचे सार ह्या पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले आहे. पूर्वी इतरांसाठी पुरेसा वेळ व माफक पैसा होता. आजच्या पिढीकडे पैसा मुबलक असला करी इतरांसाठी वेळ नाही. पूर्वी संवादाची साधने मर्यादित असली तरी समाधान होते. आजची परिस्थिति अगदी उलट आहे. यशस्वी जीवनासाठी युवकांना प्रोत्साहित करणे आवश्यक झाले आहे. त्याच उद्देशाने ह्या पुस्तकाचे लेखन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

यावेळी दरवर्षीप्रमाणे कऱ्हाडे ब्राह्मण ज्ञातितील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते रोख पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला. शालांत परिक्षेत सर्वात जास्त ७ पारितोषिके कु. सानिका मुकुंद ठाकूर हिने तर उच्च शालांत परिक्षेत चि. शार्दुल विनोद नगरकर ह्याने प्राप्त केली. चि. तुषार राज नाफडे ह्याला हॉलंड देशाची ''टूडेल्फ'' ही पदव्युत्तर शिक्षणासाठीची शिष्यवृत्ती प्राप्त केल्याबद्दल संघाचे माजी अध्यक्ष कै. नारायण बळवंत ठाकूर ह्यांचे स्मृतीप्रित्यर्थ रोख रु. २०००/- चे पारितोषिक देण्यात आले.

त्यानंतर 'काळभुत' ही एकांकिका सादर करण्यात आली. आभार प्रदर्शन संघाचे सचिव ॲड. श्री. मनिष नवाथे ह्यांनी केले तर मंचसंचालन कु. प्रणोति पराडकर हिने केले.

# PRD - 7 & PRD - 10

## PROVEN RADIAL DRILLING MACHINES

from PHI Belgaum

**'Today's Strong & Versatile Machines'**

TÜV SUD ISO 9001

iso - 9001 2008

| | | PRD-7 | PRD-10 |
|---|---|---|---|
| Drilling Capacity in M.S.<br>Max Distance between<br>spindle centre to column centre | mm | 25.4 | 32 |
| Maximum | mm | 585 | 650 |
| Minimum | mm | 285 | 300 |
| Maximum Distance<br>(Spindle nose to base) | mm | 533 | 660 |
| Travel of Spindle | mm | 125 | 125 |
| Spindle Speeds nos. / range<br>Vertical adjustment of arm | rpm<br>mm | (8)75-1850<br>533 | (8) 80-2310<br>660 |
| Travel of Drill Head | mm | 250 | 250 |

PHI

## PRAKASH HOME INDUSTRIES

Near Rani Chennamma Nagar, IInd Stage, 695C, Udyambag P.O.,
Belgaum - 590 008 **Ph. :** 0831-2441626, 2442390
**Fax :** 0831-2445026 **E-mail :** phibgm@dataone.in

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण
परिवारास
हार्दिक शुभेच्छा!

काटदरे

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण
परिवारास
हार्दिक शुभेच्छा!

## चोखंदळ ग्राहकांची पहिली पसंती

**स्वादिष्ट चवींचा सुवर्णमहोत्सव साजरा करणारे काटदरे मसाले आता**
**आपल्याही शहरामध्ये उपलब्ध**

**ए-वन कांदा लसूण मसाला, खमंग चटण्या, चटकदार लोणची,**
**उपवासाची पिठे व भाजण्या, इनस्टंट मिक्सेस, केशरयुक्त दूध मसाला,**
**ताक मसाला, मिसळ मसाला इ.**

वितरक नेमणे आहेत.

# काटदरे फूड प्रॉडक्ट्स प्रा. लि.,

**जे२/१७, ॲडिशनल एम. आय. डी. सी., सातारा - ४१५ ००४**

**Customer Care No. (02162)240678**
**E-mail : katdare_masala@yahoo.co.in**

# आदित्य किंजवडेकरला 'बालवैज्ञानिक' पुरस्कार प्राप्त

''मुंबई विज्ञान अध्यापक मंडळातर्फे गेली ३२ वर्षे'' 'डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा' घेतली जाते. २०१२-२०१३ या वर्षातील स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून सुमारे ४०,००० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. चार फेरीतून अंतिम फेरीत निवड होते. पहिल्या फेरीतून ७५% दुसऱ्या फेरीतून त्यातील १०% विद्यार्थ्यांना प्रकल्प व मुलाखतीसाठी निवडतात. यातून १०% विद्यार्थ्यांना सुवर्णपदक व रौप्य पदकासाठी निवडले जाते.

अशा अतिशय कठीण परीक्षेतून आपल्या संघाचे सभासद श्री. भा.द. किंजवडेकर यांचा नातू चि. आदित्य जितेंद्र किंजवडेकर (अक्षरनंदन शाळा इ. ७ वी) याने रौप्य पदक मिळवून २०१२-२०१३ या वर्षीचा 'बालवैज्ञानिक' पुरस्कार मिळविला.

अभिनंदन!

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ मुलुंड संस्थेमध्ये कोजिगिरी पौर्णिमा साजरी व वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

**कार्यवाहक - माधुरी शेंबेकर**

दि. २० ऑक्टोबर २०१३ रविवार संध्या ५.३० वा. विरंगुळा केंद्र मुलुंड पूर्व येथे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त 'चांदणे सुरांचे' हा चांदणे गीतांवर आधारित कार्यक्रम मोठ्या दिमाखात साजरा झाला.

सुरुवातीला अध्यक्ष श्री. अविनाश मंडपे यांनी कोजागिरी विषयी दोन वेगवेगळ्या माहितीपूर्ण गोष्टी सांगून वातावरण निर्मिती केली. संघातील सभासदच गायक-निवेदक असल्याने सभासद, त्यांचे नातेवाईक यांनी कार्यक्रमाला भरघोस प्रतिसाद दिला. 'चांदणे' शब्द असलेल्या अनेक जुन्या-नव्या गीतांचा मागोवा निवेदका सौ. जान्हवी लघाटे यांनी घेतला.

गायक-गायिका-गीतकार-संगीतकार, वादक यांनी निर्माण करुन ठेवलेलं कलावैभव-सूरताल, शब्दांच्या माध्यमातून रसिकांपर्यंत पोहो-चणारे गायक होते-सौ. मधुश्री कार्किर्डे, डॉ. केतकी जोशी, श्री निशिकांत गोठोस्कर आणि बालकलाकार कु. निमिषा कार्किर्डे.

हार्मोनियम आणि तबला यांना बोलकं केल- सौ. शीला जोशी आणि सौ. जान्हवी मराठे यांनी.

आपल्या प्रत्येक कार्यक्रमात नवीन सभासदांचा परिचय-स्वागत हो-तेच. श्री. सदानंद सरपोतदार यांनी कलाकारांना संगीत सेवेबद्दल आणि उपस्थितांना कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल धन्यवाद दिले.

केशरी दुध आणि अल्पोपहार यांचा आस्वाद घेत उपस्थितांनी ऐकमेकांचा परिचय अधिक दृढ केला.

वार्षिक सर्वसाधारण सभा २०१३ चा वृत्तांत

श्रीमती माधुरी शेंबेकर यांच्या गणेशस्तवन आणि शारदास्तवनाने सभेला सुरूवात झाली.

अध्यक्ष श्री. अविनाश मंडपे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यवाह श्री. श्रीपाद सप्रे यांनी सभेपुढील कामकाजाचा आढावा घेतला. त्यानंतर अहवालवाचन,आर्थिक विवरण पत्रे इ. विषयांना मंजुरी मिळाली.

संघ बाल्यावस्थेत असल्याने सभासदवाढीबद्दल आणि संघ समाजाभिमुख होण्याच्या दृष्टीने कार्य व्यापक होण्यासाठी मा. अध्यक्षांनी काही योजना सांगितल्या. त्यावर सभासदांनी त्यांचे विचार व्यक्त केले आणि पुढील निर्णय घेतले गेले

१) माहेरवाशिणींना सभासद करून घेणे.

२) घरातील अन्य व्यक्तींना सभासद करून घेणे.

३) सभासदांनी आपापल्या विभागातील कऱ्हाडे ब्राह्मणांना सभासद होण्यास उद्युक्त करावे.

४) समाजासाठी कार्य करण्यासाठी विविध समित्या उदा. शिक्षणसमिती,आरोग्यसमिती, वधुवर सूचक मंडळ समिती, युवा कऱ्हाडा समिती, उद्योजकांसाठी बिझनेस फोरम समिती, निधी समिती, कार्यक्रम समिती. अशा प्रकारच्या समित्या स्थापन करून कार्यविस्तार करावा.

५) वृद्धाश्रमाचा (ज्ञातीबांधवांसाठी) विचार करावा.

६) संघाच्या वास्तुसाठी तसेच संस्था चालविण्यासाठी पैसा आणि मनुष्यबळ हे आवश्यक घटक आहेत. त्यासाठी काय काय करता येईल यावर चर्चा झाली.

७) दर दोन महिन्यांनी सभासदांच्या गाठीभेटी होण्यासाठी सशुल्क कार्यक्रम करावेत.

संघाच्या कार्यविस्ताराच्या दृष्टीने कार्यकारिणीत सभासद संख्या ७ ऐवजी ९ करण्यात आली. नवीन कार्यकारणी

१) अध्यक्ष- श्री. अविनाश मंडपे

२) कार्यवाह- श्रीमती माधुरी श्रीकांत शेंबेकर

३) खजिनदार- श्री. जयंत लघाटे

४) सदस्य- श्री. अशोक खांडेकर

५) सदस्य- श्री. राजीव आठल्ये

६) सदस्य- श्री. विवेक शहाणे

७) सदस्य- श्री. सदानंद सरपोतदार

८) सदस्य- श्री. प्रकाश आंबर्डेकर

९) सदस्या- सौ. योगिता वाकणकर

अन्य सामाजिक संस्थातून कार्यरत असलेल्या आपल्या सभासदांचे उल्लेखनीय कार्याबद्दल संघातर्फे अभिनंदन केले. ते सभासद-

१) कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या आर्थिक उपक्रमासाठीच्या कमिटीच्या अध्यक्षपदी श्री. अविनाश मंडपे यांची नियुक्ती झाली.

२) रोटरीक्लब मुंबई मुलुंड-पूर्व- येथे श्री. श्रीपाद सप्रे यांची सचिव पदी निवड झाली.

३) संस्कारभारती कोकण प्रांताच्या मुंबईविभागात पूर्वविभागप्रमुख म्हणून माधुरी शेंबेकर यांची नियुक्ती झाली.

खजिनदार श्री. जयंत लघाटे यांनी 'संपर्क' चे वर्गणीदार होण्यासाठी सर्वांना माहिती दिली.

नवीन सभासदांच्या परिचयानंतर माधुरी शेंबेकर यांनी यथोचित कृतज्ञता व्यक्त करून सभा संपन्न झाली.


यशाकडे वाटचाल करण्यासाठी सद्वर्तन हा पहिला टप्पा असतो.

# बेळगाव शाखेचा वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

**अध्यक्ष –श्री. चंद्रशेखर जोशी**

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बेळगावची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २५ ऑगस्ट रोजी हेरवाडकर हायस्कूलच्या हॉलमध्ये पार पडली. अध्यक्षस्थानी उपाध्यक्ष श्री. अक्षय खांडेकर होते. प्रारंभी गेल्या वर्षात देवाज्ञा झालेल्या सभासदांना श्रध्दांजली वाहण्यात आली. त्यानंतर कु. रूचा जोशी हिच्या गुरूवंदना नृत्याने कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रास्तविक व स्वागत श्री. खांडेकर यांनी केले. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी स्वातंत्र्यासाठी बलिदान केलेल्या सर्व देशभक्तांचे स्मरण करुन त्यांना श्रध्दांजली वाहिली व संघाच्या सद्यस्थितीची माहिती दिली. त्यानंतर कार्यवाह श्री. शिरीष कानेटकर यांनी गेल्या वर्षाचा अहवाल सादर केला व सभेने त्याला मंजुरी दिली. श्री. हेमंत बेंद्रे यांनी गेल्या वर्षाचा लेखा–परिक्षण अहवाल सादर केला. सभेने त्याला मंजुरी दिली. पुढील वर्षासाठी ऑडिटर म्हणून मे. परांजपे, फडणीस आणि कं.ची नेमणूक करण्यात आली. श्री. उदय शेवडे यांनी शैक्षणिक फंडाची माहिती दिली.

यानंतर आजचे प्रमुख वक्ते, रिटायर्ड प्रिंसिपॉल श्री. व्ही.ए. पाटील यांचा परिचय श्री. सुहास गुर्जर यांनी करून दिला. श्री. पाटील यांनी 'करियर गायडंस्' वर व्याख्यान देऊन विद्यर्थ्यांना निरनिराळ्या शाखांची माहिती दिली व मार्गदर्शन केले. त्यांच्या हस्ते गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. बेंद्रे–गुर्जर ट्रस्टतर्फेही गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार श्री. वसंतराव गुर्जर यांनी केला. अभ्यासाव्यतिरीक्त इतर विषयात प्रावीण्य मिळविलेल्यांचा सत्कार श्री. अशोक परांजपे यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विजय भागवत यांनी केले. आभार प्रदर्शन कु. प्रज्ञा बाकरे यांनी केले. प्रिती–भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# दिवाळी पहाट व शारदीय संमेलन डोंबिवली शाखेमध्ये संपन्न

**कार्यवाहक – श्री. प्रदीप हळवे.**

## दिवाळी पहाट

कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ,डोंबिवली आयोजित दरवर्षीप्रमाणे याही वर्षी समाज मंदिर सभागृह, डोंबिवली येथे दिवाळी पहाट हा कार्यक्रम रविवार दि. ०३–११–२०१३ रोजी संपन्न झाला. सकाळी ७.०० वा. कार्यक्रमाला सुरूवात झाली. या वर्षी पंडित सुरेश बापट यांच्या गाण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यांनी भक्तीगीते, नाट्यगीते, इ. गाणी अप्रतिम सादर केली. अतिशय बहारदार असा कार्यक्रम झाला. उपस्थित श्रोत्यांनी कार्यक्रमाला भरभरून दाद दिली. पंडितजींना तबल्यावर श्री. धनंजय पुराणिक व हार्मोनियमवर नीला सोहनी यांनी साथ दिली.

या कार्यक्रमाचे डोंबिवली पुर्व कार्यकारिणीने आयोजन केले होते. या कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी संस्थेचे सांस्कृतिक कार्यक्रम समिती प्रमुख श्री. केदार सु. पाध्ये यांनी उत्तम प्रकारे सांभाळली.

## शारदीय संमेलन

कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली आयोजित शारदीय संमेलन कल्याण येथे शारदा विद्यालयाच्या सभागृहामध्ये रविवार दि. २७/११/२०१३ रोजी संपन्न झाले. सायंकाळी ५.०० वा. पासून कार्यक्रमाला सुरूवात झाली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. श्री. रघुनाथ मधुसूदन शेजवलकर लाभले होते. कार्यक्रमाला पाहुण्यांच्या हस्ते व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून तसेच स्वागतगीताने सुरुवात झाली. संस्थेचे यावेळचे अध्यक्ष मा. श्री. मोहन स. सरपोतदार यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. अध्यक्षांनी पाहुण्यांना पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरवले. त्याचप्रमाणे त्यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष मा.डॉ.श्री. अरूण अ. नाटेकर व उपाध्यक्ष मा.श्री. श्रीधर रा. देवस्थळी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. संस्थेचे सहकार्यवाह मा. श्री. सुहास म. पंडित यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे मा. डॉ. श्री. शेजवलकर यांनी आपले विचार मांडले. त्यानंतर अध्यक्ष मा.श्री. सरपोतदार यांनी अध्यक्षीय भाषण केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. दिपाली रविंद्र पंडित यांनी केले. मध्यंतरात मसाला दुधाचा आस्वाद सर्वांनी घेतला.

दुसऱ्या सत्रामध्ये मा. डॉ. श्री. विश्वास मेहेंदळे यांचा 'पंडितजी ते अटलजी आणि आता मनमोहनजी' असा एकपात्री कार्यक्रम झाला. उपस्थित रसिक प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. कार्यक्रम अतिशय रंगतदार झाला.

सदर कार्यक्रम कल्याण नगर कार्यकारिणीने आयोजित केला होता. या संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी संस्थेचे सांस्कृतिक समिती प्रमुख श्री. केदार सु. पाध्ये यांनी घेतली होती.

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ - सोलापूर शाखा वृत्तांत

**श्रीकांत माईणकर**

संघातर्फे दरवर्षी वर्धापन दिन, झाशीच्या महाराणी लक्ष्मीबाई यांचा स्मृतीदिन गुणवंत विद्यार्थी कौतुक समारंभ, कोजागिरी पौर्णिमा व मकर संक्रांत हे कार्यक्रम साजरे केले जातात.

संघाचा वर्धापन दिन एप्रिल मध्ये साजरा केला गेला सुरुवातीस संघाचा अहवाल श्री. माईणकर यांनी सादर केला. त्यानंतर संघाचीच एक शाखा असलेल्या रात्री लक्ष्मीबाई महिला मंडळाचा अहवाल सौ. स्मिता देवस्थळी यांनी सादर केला.

यानंतर संघाचे सदस्य श्री. चंद्रशेखर सप्रे यांनी भगवद्‌गीतेतील महत्वाच्या ओव्याबाबत थोडक्यांत माहिती सांगितली, तर संघाचेच सदस्य श्री. अशोक भाटवडेकर यांचे सद्य परिस्थितीतील आपली कर्तव्ये याबाबत माहिती सांगितली.

नंतर सौ. अंजली माईणकर यांनी महिला सदस्यांसाठी दोन व पुरुष सदस्यांसाठी एक स्पर्धा घेतली.

महिला सदस्यांसाठी घेतलेल्या स्पर्धेत एक अर्धवट दिलेल्या म्हणी पूर्ण करणे व दुसरी अंगठा व तर्जनी यांनी पेन्सीली उचलणे या स्पर्धा होत्या.

तर पुरुष सदस्यांसाठी घेतलेल्या स्पर्धेत महाराष्ट्रातील २६ जिल्ह्यांची नावे त्यातील एक अक्षर गाळून उलट सुलट लिहिली होती, तो गाळलेला शब्द ओळखून जिल्ह्याचे बरोबर नाव लिहिण्याची स्पर्धा घेतली.

शेवटी श्रीमती हर्डीकर यांनी आभार प्रदर्शन केले. अल्पोपहारानंतर हा कार्यक्रम संपन्न झाला.

कऱ्हाडे ब्राह्मण संघ व महाराणी लक्ष्मीबाई महिला मंडळ यांच्या सहकार्याने १८ जून रोजी झाशीच्या महाराणी लक्ष्मीबाई यांचा स्मृतीदिन साजरा करण्यात आला. यामध्ये महिला मंडळाच्या सदस्या सौ. माधवी भाटवडेकर यांचे झाशीच्या महाराणी लक्ष्मीबाई यांच्या बालपणापासूनच्या जीवन कार्यावर आधारित व्याख्यान झाले. आभार प्रदर्शनानंतर हा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस संघाचे सदस्य श्री. सुधीर शेणोलीकर यांचे हस्ते राणी लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला.


कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

**वसुधा एंटरप्रायजेस**

इंटरिअर डेकोरेटर्स

श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८

▪ फर्निचर ▪ प्लंबिंग ▪ पेंटींग ▪ फॅब्रिकेशन ▪ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ▪ ॲल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ▪ पार्टिशन्स ▪ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ▪ लॉफ्ट टँक ▪ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ▪ किचन ओटा एक्स्टेंशन ▪ वॉल टायलिंग ▪ फ्लोरिंग ▪ किचन ट्रॉलीज ▪ लॉफ्ट क्लोजींग ▪ संडास बाथरुम वॉटरप्रुफिंग ▪ बाथरुम रिनोव्हेशन ▪ सन कंट्रोल फिल्म ▪ वायरिंग ▪ पीव्हीसी फ्लोरिंग.

वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...
... सर्व सेवा एकाच छताखाली



**निकेत फोटोज्**

कर्वेनगर शाखा

सौ. नेहा सप्रे - ९८५०८८४९४५

| | |
|---|---|
| पोर्ट फोलिओ | स्कॅनिंग |
| स्टुडिओ फोटोज् | व्ही.एच.एस. / डीव्ही कॅसेटची सीडी |
| पासपोर्ट फोटोज् | कॅमेरा रिपेअरिंग |
| रोल्स डेव्हलपिंग/प्रिंटींग | टेबल टॉप्स |
| लॅमिनेशन | इंडस्ट्रिअल फोटोग्राफी / व्हिडीओ शूटींग |
| डिजीटल मिक्सिंग फोटोज् | सर्व प्रकारच्या लहान मोठ्या कार्यक्रमांचे |
| कोलाज् | फोटो आणि व्हिडीओ शूटींग |

* अपंग किंवा दुर्धर आजारी लोकांसाठी
घरी येऊन फोटो काढण्याची सुविधा



कृती करण्याच्या निर्णयापासूनच यशाची सुरुवात होते.

*With*

*Best Compliments*

*from,*

# Snehal Printers

Commercial Printers

Near Hanuman Mandir, Dattawadi, Akurdi,

Pune - 411 035

**Tel. : 020-27652128 / 27651275**

E-mail : swapnilsakhalkar@gmail.com

Shrikant Sakhalkar 9850130920



# ‘कऱ्हाडे ब्राह्मण Business Forum’ ची मुहूर्तमेढ

आज समाजात व्यवसाय व उद्योग या क्षेत्रात आपल्याला काही विशिष्ट ज्ञातीतील लोकांचे प्राबल्य आढळून येते. अशा वातावरणात कऱ्हाडे ब्राह्मण ज्ञातीबांधवांना स्वतःचा व्यवसाय उभा करणे व वाढवणे कष्टप्रद ठरते. या परिस्थितीत आपला उत्कर्ष साध्य करण्यासाठी उद्योग व व्यवसाय क्षेत्रातील ज्ञातीबंधावांची संघटना असणे आवश्यक ठरते. त्याच बरोबर आजच्या स्पर्धा युगात कऱ्हाडे ब्राह्मण ज्ञातीतील विद्यार्थी आणि युवकांना शिक्षण तसेच नोकरी या दोन्ही क्षेत्रात तीव्र स्पर्धेला सामना करावा लागतो. या सर्व परिस्थितीचा विचार करता ज्ञातिबांधवांनी स्वतःच्या, ज्ञातीच्या तसेच देशाच्या विकासासाठी व्यवसाय व उद्योग या क्षेत्राकडे वळणे अपरिहार्य झाले आहे. आणि असा प्रयत्न करू पाहणाऱ्या सर्व ज्ञातिबांधवांना मदत करण्याची जबाबदारी कऱ्हाडे ब्राह्मण संघांची आहे.

या पार्श्वभूमीवर, कऱ्हाडे ब्राह्मण ज्ञातीतील सर्व व्यावसायिक व उद्योजकांच्या उत्कर्षासाठी कऱ्हाडे ब्राह्मण संघ ठाणे यांच्या विद्यमाने २२ जून २०१३ रोजी ’कऱ्हाडे ब्राह्मण Business Forum’ ची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यात कऱ्हाडे ब्राह्मण संघ ठाणेचे अध्यक्ष, श्री रवींद्र प्रभुदेसाई यांचे मोलाचे पाठबळ लाभले. आजमितीला ठाणे शहरातील २५ व्यावसायिक व उद्योजक हे या फोरमचे सदस्य झाले आहेत. सदस्यसंख्या पुढील काही महिन्यात ४० पर्यंत नेण्याचे प्रयत्न चालू आहेत. यांमध्ये उत्पादन, आर्किटेक्ट, शिक्षण वर्ग, जाहिरात, मुद्रण, सी ए, वैयक्तिक आर्थिक सल्लागार अशा विविध क्षेत्रात वावरणाऱ्या व आपापल्या क्षेत्रात यश व कीर्ती संपादन केलेल्या व्यक्ती आहेत, ज्यांची वार्षिक व्यावसायिक उलाढाल काही लाख रुपयांपासून १०० कोटी रुपयांपर्यंत आहे.

या फोरमचे स्वरूप हे ’एकमेका सहाय्य करू’ या तत्वावर आधारित आहे. फोरमचे सदस्य महिन्यातून दोनदा, शनिवारी सकाळी ८ ते १० या वेळात भेटतात. या सर्व भेटी BNI सारख्या व्यावसायिक संघांच्या धर्तीवर आखीव व समयबद्ध असतात. यामध्ये प्रत्येक उपस्थित सदस्याला बोलण्याची संधी दिली जाते. आपल्याला मिळालेल्या वेळात सदस्य आपला व्यवसाय, आपले मुख्य उत्पादन / सेवा, आपले प्रमुख ग्राहक, आपल्याला गरज असलेली उत्पादन / सेवा आणि आपण इतर सदस्यांना काय मदत देऊ / घेऊ शकतो याबाबत माहिती देतात. या संपर्कातून सदस्यांमध्ये आजमितीला फक्त ६ महिन्यात अंदाजे २५ ते ३० लाख रुपयांची व्यापारी उलाढाल झाली आहे. आणि सदस्यांमधील व्यवसाय सहकार्याच्या इतर शक्यता लक्षात घेता असे म्हणणे उचित होईल कि स्थापनेच्या पहिल्याच वर्षात फक्त ठाणे शहरात Business Forum सदस्यांची परस्पर सहाय्याने झालेली व्यापारी उलाढाल काही कोटी रुपयांमध्ये असेल.

या यशाने प्रेरित होऊन अशा प्रयत्नांना कायमस्वरूपी स्थैर्य येण्याच्या दृष्टीने काही उपक्रम चालू आहेत. यामधील महत्वाचे काही उपक्रम (१) ’कऱ्हाडे ब्राह्मण Business Forum’ ची नोंदणी करणे, (२) या प्रयत्नाचे लोण सर्व महाराष्ट्रात, भारतात आणि इतर देशातील ज्ञातीबांधवांपर्यंत पोचविणे, (३) सर्व सदस्यांची माहिती पुस्तिका (directory) बनवणे, असे आहेत. या संदर्भात कोणतीही माहिती घेण्याची / मदत करण्याची इच्छा असल्यास कृपया Business Forum चे अध्यक्ष श्री. माधव नानिवडेकर (९८६९०५५२४३), सचिव श्री. विनोद कुवळेकर (९९६९२७४२०३) अथवा कोषाध्यक्ष श्री. राकेश आंबेकर (९८६९२३६३३४) यांच्याशी संपर्क करावा.

या Business Forum ची व्याप्ती महाराष्ट्रात, देशात तसेच सर्व जगात वाढो, अशा परस्पर सहकार्यातून सर्व ज्ञातीबांधवांसाठी एक भक्कम आधारवृक्ष उभा राहो आणि कऱ्हाडे ब्राह्मण ज्ञाती ही आपल्या इतर सर्व गुण वैशिष्ट्याबरोबरच व्यवसाय व उद्योग यांतही अग्रणी गणली जावो अशी ईश्वरचरणी प्रार्थना !!!

**अभय आठल्ये**

सचिव, कऱ्हाडे ब्राह्मण संघ ठाणे

# आपणासर्वांना हार्दिक शुभेच्छा

कऱ्हाडे ब्राह्मण
बिझिनेस फोरम

# कऱ्हाडे ब्राह्मण बिझिनेस फोरम

स्थापना : २२ जून २०१३

C/o Pitambari, Ground Floor, Hemendra Society, Gokhale Road,
Naupada, Thane-400602
Tel. : 9869055243, 9869236334, 9969274203

## कऱ्हाडे ज्ञातीतील सर्व उद्योजकांच्या
## व
## व्यावसायीकांच्या उत्कर्षासाठी
## सुरू केलेली एक चळवळ

# सातारा संस्थेत कोजागिरीनिमित्त 'कुटुंब रंगले काव्यात' चा बहारदार कार्यक्रम

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सातारा यांचे तर्फे कोजागरी पौर्णिमेनिमित्त सुप्रसिद्ध एकपात्री कलाकार श्री. विसूभाऊ बापट यांचा 'कुटुंब रंगलय काव्यात' हा बहारदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. संघाचे उपाध्यक्ष श्री. बाळासाहेब भाटे यांच्या ओघवत्या प्रास्ताविकानंतर श्री. मुकुंदराव मोघे यांनी संघाच्या वाटचालीचा थोडक्यात आढावा घेतला. श्री. सुरेश साधले यांनी श्री. विसूभाऊ बापट यांचा परिचय करून दिला. त्यानंतर श्री. विसूभाऊ बापट यांनी कविता, काव्य म्हणजे काय? याची मनोरंजक उकल करून त्याचे अनेकविध प्रकार मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या रसिक श्रोत्यांना ऐकवून अडीच तास मंत्रमुग्ध केले. त्यांचा हा २५६० वा कार्यक्रम झाला. श्री. सुधीर पाध्ये यांनी तबल्यावर सुयोग्य साथ केली. या प्रसंगी ज्ञातीमधील जेष्ठ व्यक्तींचा अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दुग्धपानाने कार्यक्रमाची सांगता झाली. सर्व कार्यकारणी सदस्यांच्या परिश्रमामुळे कार्यक्रम उठावदार आणि यशस्वी झाला.



दीप प्रज्वलन करताना
श्री. विसूभाऊ बापट, श्री. यशवंत पंडित, श्री. बाळासाहेब भाटे, श्री. साधले,


# हॅप्पी हॉलिडेज् - डोंबिवली (पूर्व)

**श्री क्षेत्र हरिहरेश्वर - "महाशिवरात्र विशेष सहल"**
**(पाली, दिवेआगर, श्रीवर्धनसह)**
**२६ ते २७ फेब्रुवारी २०१४**

बुकिंग चालू आहे

AC बसने प्रवास, हॉटेल वास्तव्य, रूचकर जेवण (उपवासाचे सुद्धा उपलब्ध), (स्वतंत्र / ग्रुपमध्ये निवास पर्याय उपलब्ध)

**आमच्या इतर सेवा**

- पॅकेज टूर्स
- हॉटेल रिसॉर्ट बुकिंग
- कार रेंटल
- कृषी पर्यटन
- धार्मिक पर्यटन

**आमच्या इतर सहली (प्युअर व्हेज)**

- हुर्डा फार्म (डिसेंबर-जानेवारी)
- आंबा महोत्सव - कोकण (एप्रिल - मे)
- वर्षासहली - रायगड - शिवथरघळ (जुलै ते सप्टेंबर)
- कृषि पर्यटन - लवासा लेक सिटी
- मोराची चिंचोली - अष्टविनायक दर्शन (२ दिवसात)
- गणपतीपुळे, हेदवी, वेळणेश्वर, गुहागर
- आकाश दर्शन

**वैभव दामले - 9757362155 / 9969055402 / 9757104563**



आयुष्यात कोणाचेही वाईट न करण्याचा चांगुलपणा करावा.

## सिने व नाट्य जगतातील
# ‘कऱ्हाडे’
## व्यक्तिमत्वे



श्रीकांत मोघे



रवींद्र महाजनी



उदय टिकेकर



इला भाटे

Regd.Periodical RNI- No. MAHAMAR/2013/51438 (DECL.No. SDM/PUNE/SR/89/2013)


# PANDIT JAVDEKAR CONSTRUCTIONS

Premium Projects in Prestigious Locations



**Contact :** 64/31, Krishnakunj, Bharti Niwas
Chowk, Off Income Tax Lane, Erandwane, Pune - 411004
**Phone No : 020- 25451007/ 25457217/ 25458334**
Email : panjavasso@gmail.com
Website : www.panditjavdekar.com


BOOK -POST(Regd. Periodical)

प्रेषक:
संपादक - भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे- ४११ ०३०

To,